# औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद

निष्काम जन सेवायै समर्पिता

**दिनांक २९/०८/२०१८ रोजी (का.प.क्र.०८) संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त.**

बुधवार दिनांक २९/०८/२०१८ रोजी (का.प.क्र.०८) मा.सभापती श्री.रेणुकादास (राजु) दत्तोपंत वैद्य यांच्या अध्यक्षतेखाली महानगरपालिकेची स्थायी समितीची सभा महापालिका कार्यालयातील मलिक अंबर स्थायी समिती सभागृह येथे सकाळी ११:३२ वाजता वंदेमातरम् या गिताने सुरु झाली. सभेला मा.आयुक्त,श्री.डॉ.विनायक निपुण, नगर सचिव,श्री.दिलीप सुर्यवंशी व संबंधित अधिकारी तसेच खालील प्रमाणे स.सभासद उपस्थित होते.

०१. स.स.श्री.गजानन रामकिसन बारवाल
०२. स.स.श्री.ऋषीकेश चंद्रकांत खैरे
०३. स.स.श्री.सिध्दांत संजय शिरसाट
०४. स.स.श्रीमती राखी प्रशांत देसरडा
०५. स.स.श्रीमती शेख नरगीस सलीम
०६. स.स.श्री.रूपचंद लक्ष्मण वाघमारे
०७. स.स.श्रीमती स्वाती किशोर नागरे
०८. स.स.श्रीमती सत्यभामा दामुअण्णा शिंदे
०९. स.स.श्री.पुनमचंद सोनाजी बमणे
१०. स.स.श्रीमती खान सायराबानो अजमल
११. स.स.श्रीमती जयश्री सुरेंद्र कुलकर्णी
१२. स.स.श्रीमती खान नसरीन बेगम समद यारखान
१३. स.स.श्रीमती शिल्पाराणी सागरअप्पा वाडकर
१४. स.स.श्री.अब्दुल नविद अब्दुल रशीद

श्रीमती शिल्पाराणी वाडकर : मंगोलिया येथे झालेल्या एशियन ज्युनियर बुध्दीबळ चॅम्पियनशिपमध्ये औरंगाबदची युवा खेळाडु कु.साक्षी चितलंगे यांनी रौप्य पदक मिळवले आहे. त्यांचा अभिनंदनाचा प्रस्ताव ठेवण्यात येतो.

श्रीमती.स्वाती नागरे : माझे त्यास अनुमोदन आहे.

श्रीमती.राखी देसरडा : त्यास अनुमोदन आहे.

मा.सभापती : अभिनंदनाचा प्रस्ताव मंजुर करण्यात येतो. आज जागतिक क्रिडा दिन असल्यामुळे मा.महापौरांनी सर्व खेळाडुंना आज दुपारी त्यांचा सत्कार करण्यासाठी सर्वसाधारण सभेच्या सभागृहामध्ये आमंत्रित केलेले आहे.

श्री.सिध्दांत शिरसाट : मागच्या काही बैठकीमध्ये अतिक्रमण विषय प्रश्न उपस्थित केले होते. बीड बाय पास सर्व्हिस रोड वरील अतिक्रमण आणि रेल्वे स्टेशनचा पेट्रोल पंप असे दोन विषय होते. परंतु त्यामध्ये कुठलीही कारवाई महानगरपालिकेने केलेली दिसत नाही.

श्री.गजानन बारवाल : नागरिकांना याचा खुप त्रास सहन करावा लागत आहे. रस्ता जेव्हा बनेल तेव्हा बनेल परंतु सध्या तात्पुरत्या स्वरुपात रस्ता बनवुन दिला पाहिजे. यामध्ये प्रशासनाने कुठलाही ठोस पाऊल उचललेला नाही.

श्रीमती.शिल्पाराणी वाडकर: बीड बायपासवर मागच्या आठवड्यामध्ये तीन लोकांचा मृत्यु झाला होता. शहरातील इतर ठिकाणांची अतिक्रमणे सुध्दा पाडले गेलेली नाही. गजानन नगर येथील अतिक्रमण आजच्या आज काढले गेले पाहिजे. यामध्ये सक्षम अधिकारी नेमण्यात यावा.

श्रीमती.स्वाती नागरे : भाजी मंडी येथील सुध्दा अतिक्रमण काढण्यासाठी सातत्याने सांगत आले आहे. तिथे फक्त आठ दिवस कारवाई करण्यात आली.

| | |
|---|---|
| मा.सभापती | : श्री.अभंग जे स.सदस्यांनी अतिक्रमणच्या संबंधी प्रश्न उपस्थित केले त्याचा खुलासा करावा. |
| कार्य. अभियंता(अति) | : बीड बाय पासच प्रकरण मा.उच्च न्यायालयामध्ये आहे. |
| मा.सभापती | : विधी सल्लागार यांनी बीड बाय पासच काय प्रकरण आहे ते सांगावे. |
| विधी सल्लागार | : बीड बाय पास वरील सर्व्हिस रोडवर जे अतिक्रमण झाले आहे त्यांना टाऊन प्लॅनिंगकडुन नोटीस देण्यात आलेली आहे आणि सहा तारखेला त्याची सुनावणीचे पण निर्धारित करण्यात आले आहे. |
| मा.सभापती | : अतिक्रमण काढण्यासाठी न्यायालयाने कुठला स्थिगित आदेश दिला आहे का? |
| विधी सल्लागार | : नोटीस दिलेली आहे सुनावणी करुन अंतिम निर्णय देऊनच कारवाई करावी लागेल. |
| मा.सभापती | : सुनावणीचे काय झाले? |
| नगर रचना | : सुनावणीच्या संदर्भामध्ये जे काही बाधित नागरीक आहे त्यांना बोलावण्यात आले आहे. त्याच्यावर निर्णय होईल. |
| मा.सभापती | : मा.आयुक्तांनी खुलासा करावा. |
| मा.आयुक्त | : बीड बाय पासच्या बाबतीत मा.कोर्टामध्ये दोन केस चालु आहे. रस्त्यावर खुप अपघात होत आहे त्यामुळे तो रस्ता करण्यात यावा अशी याचिका दाखल केली आहे. मागच्या महिन्यात त्या सर्व लोकांना नोटीस दिल्या आहे. आधी ते कायदेशीर आहे की बेकायदेशीर आहे ते बघावे लागेल. तो कायदेशिर असेल तर त्यांना मोबदला देण्यासाठी जी काही रक्कम लागेल ती देऊ. डीपी प्लॅन १० ते २० टक्केच इंप्लिमेंन्ट झालेला आहे. पुर्ण डीपी प्लॅन इंप्लिमेंन्ट करायचा एक हजार कोटी रुपये लागणार आहे. डीपी प्लॅनचे सर्वच रस्ते करण्याची गरजेचे आहे. १५० कोटीच्या रस्त्यांचा विषय सुध्दा मा.कोर्टामध्ये आहे. यामध्ये सातारा, उस्मानपुरा सुध्दा आहे. ते रस्ते लवकरच करणार आहोत त्यासाठी थोडा वेळ लागणार आहे. |
| श्री.सिध्दांत शिरसाट | : मागच्या वेळेस तिथे पाहणी केली होती ते करत असतांना काही लोकांनी तिथे रोष व्यक्त केला. जो तीस मीटरचा रस्ता आहे त्यावर काही टपऱ्या आहेत किमान ते तरी काढण्यात याव्या. |
| श्री.गजानन बारवाल | : काही ठिकाणी लोक जागा देण्यासाठी तयार आहे. |
| मा.सभापती | : स.सदस्यांनी जो प्रश्न उपस्थित केला काही ठिकाणी रस्त्यावर टपऱ्या लागलेल्या आहेत त्यांच्यावर कारवाई करण्यासाठी कुठलीही अडचण नाही ते ताबडतोब करण्यात यावे. |
| श्री.सिध्दांत शिरसाट | : खुलासा करण्यात यावा की, अतिक्रमण किती दिवसात काढणार आहे. |
| कार्य.अभियंता(अति) | : तीस मीटर रोडवरील जेवढेही अतिक्रमण होते ते सगळे काढण्यात आलेली आहे. |
| मा.सभापती | : सभागृहात चुकीची माहिती देऊ नका. तुम्ही जबाबदार अधिकारी आहात. किती दिवसात कारवाई करता येईल ते सांगावे. |
| कार्य.अभियंता(अति) | : दोन दिवसात काम पुर्ण करुन देतो. |
| श्री.सिध्दांत शिरसाट | : रेल्वे स्टेशन पेट्रोल पंप विषयावर मागच्या बैठकीत आदेश दिले होते की, ती जागा घेणे बाकी आहे ताबडतोब अकाउंटला पाठवा. त्या फाईलचे काय झाले. |
| मा.सभापती | : Acquisition चे काय झाले. |
| अधिकारी(कुलकर्णी) | : आजच सर्व संचिका लेखा विभागाकडे पाठवुन देतो. |
| मा.सभापती | : ती फाईल लवकरात लवकर पुढे पाठवा. |
| श्री.सिध्दांत शिरसाट | : त्या फाईलच्या बाबतीत मा.आयुक्तांचा खुलासा नाही त्यामुळे परत ती फाईल अकाऊंट विभागामध्ये पाठवण्यात आली. |
| मा.सभापती | : श्री.साळुंके साहेब ती फाईल तुमच्याकडे आली आहे का? याची काही माहिती आहे का? विभागात फोन लावुन विचारुन घ्या आणि काय आहे ते सांगा. ती गेली नसेल तर लवकरात लवकर मा.आयुक्तांकडे पाठवा. |

श्री.सिध्दांत शिरसाट : मागच्या वेळेस वार्डातील मा.आयुक्तांना काही अतिक्रमण दाखवले होते. आरटीओ ऑफिसची भिंत दाखवली होती. आयुक्तांनी सांगितले होते की, दोन दिवसात होऊन जाईल. मैत्रे म्हणुन आरटीओ ऑफिसर आहे त्यांच्या सोबत मा.महापौरांची बैठक झाली होती. त्या बैठकमध्ये झालेले मिनिटस् देऊन ते एनओसी द्यायला तयार आहे. ती भिंत काढुन घ्यायची आहे. हॉलिडे कॅम्पचा जो डीपी रोड आहे तिथे फक्त कंपाऊड वॉल आहे आणि एका व्यक्तिचे घर आहे. त्यामुळे ते अतिक्रमण वारंवार थांबविले जात आहे. त्या अतिक्रमणावर काहीच कारवाई करण्यात आलेली नाही.

मा.सभापती : ज्या टपऱ्या काढण्यात आल्या होत्या त्या परत तिथे लागल्या आहेत. त्वरित कारवाई करण्यात यावी.

श्रीमती.शिल्पाराणी वाडकर : गजानन नगरचे अतिक्रमण आजच्या आज काढण्याचे आदेशित करावे.

मा.सभापती : गजानन नगरच्या बाहेरचे अतिक्रमण काढले पण रोडच्या मध्ये जे काही अतिक्रमण आहे ते काढले गेले पाहिजे. नागरिकांना तिथे त्रास होत आहे.

कार्य.अभियंता(अति) : पावसाच्या दिवसांमध्ये अतिक्रमण काढता येत नाही.

मा.सभापती : वर्षभरापासुन स.सदस्य सांगत आहे. उडवा उडवीची उत्तरे देऊ नका. सात दिवसाच्या आत कारवाई करा. परत हा विषय स्थायी समितीमध्ये आला नाही पाहिजे.

श्री.रुपचंद वाघमारे : ज्या वेळेस अतिक्रमण होत असतांना सांगितले होते की अतिक्रमण होत आहे तेव्हा सुध्दा काहीच कारवाई केली नाही.

श्रीमती.स्वाती नागरे : माझ्या वार्डात स्मशानभुमी जवळ टॅक्टर उभे राहतात ते अतिक्रमण आज पर्यंत काढण्यात आलेले नाही.

मा.सभापती : ज्या ज्या सदस्यांच्या सुचना आलेल्या आहेत त्यावर सात दिवसाच्या आत कारवाई करा अन्यथा तुमच्यावर कारवाई करावी लागेल.

श्री.ऋषिकेश खैरे : पाच सहा दिवसापुर्वी समर्थ नगरमध्ये घरगुती अतिक्रमण होत त्याच्या कारवाईसाठी सगळे अतिक्रमणवाले आले त्यांनी रस्त्यावरचे दुकानदारांचे होर्डिग काढले त्यामध्ये ही पण कारवाई होती का?

मा.सभापती : पुर्ण शहरामध्ये मा.आयुक्तांच्या परवानगीनेच ती कारवाई झाली.

श्री.ऋषिकेश खैरे : कोणतीही परवानगी काढल्यावर नगरसेवकांना हे कळविले पाहिजे. कारण सगळे नागरीक माझ्याकडे आले होते. ही कारवाई योग्य आहे का की, अयोग्य आहे? या विभागामध्ये सक्षम अधिकारी देण्यात यावा.

मा.सभापती : या विभागाचा समाधान कारक काम होत नाही असे पुर्ण स्थायी समितीच्या सदस्यांचे म्हणणे आहे. मा.आयुक्तांनी यामध्ये योग्य निर्णय काढावा.

मा.आयुक्त : प्राव्हिटी ठरवतांना जेवढे विकासाच्या कामामध्ये रस्ता बनवतांना मध्ये अतिक्रमण असल्यास पब्लिक वर्क मधील अतिक्रमणाला प्राव्हिटी दिली पाहिजे. हॅरिटेक्सचे जे सगळे स्ट्रक्चर आहे त्याच्या आजु बाजुला अतिक्रमण आहेत ते सगळे काढले पाहिजे. नवीन अतिक्रमण होता कामा नये. कुठेपण नवीन अतिक्रमण होत असतांना त्यामध्ये एफआयआर झाला पाहिजे. होर्डिंग्स बाबत १ ते ४ सप्टेंबर या चार दिवसात परत माहिती घेतो आहे. मागिल माहितीमध्ये ४० टक्के शहर स्वच्छ झाला होता. लोकांनी स्वत: काढले तर चांगले होईल कारण रस्त्यावर अपघात होतात. अण्णाभाऊ साठे जयंतीच्यावेळेस रस्त्याला ब्लॉक करुन लोकांनी होर्डिंग्स लावलेले होते. त्यामध्ये अण्णाभाऊ साठे यांच्या ऐवजी बाकीच्या लोकांचीच जास्त फोटो होते. थोडस ते थांबले पाहिजे.

मा.सभापती : ज्या ठरवुन दिलेल्या होर्डिंग्स आहेत त्याच्यावर लावण्याला काही हरकत नाही. सन उत्सव त्या पध्दतीने साजरे व्हायला पाहिजे. रस्त्यात कुठेही होर्डिंग लावले गेले तर त्यावर निश्चित पणे कारवाई करायला पाहिजे.

श्री.ऋषिकेश खैरे : श्री.पांडे म्हणुन वरद गणेश रोडवर साईट मार्जीगमध्ये चहाची टपरी सुरु केली. लेखी तक्रार दिल्यावर दोन दिवसात कारवाई झाली पण चार पाच दिवसा नंतर ती टपरी सुरु झाली. माहिती घेतल्यावर अतिक्रमण विभागाकडुन जे जप्त केलेले सामान होते ते परत करण्यात आले. आज त्या व्यक्तीने तिथे रसवंती पण सुरु केली आहे. याचा खुलासा करण्यात यावा.

मा.सभापती : श्री.अभंग यांनी याचा खुलासा करावा.

कार्य.अभियंता(अति) : ज्या टपऱ्या उचलतो त्यावर पेनल्टी भरुन ते वापस केल्या जातात.

श्री.ऋषिकेश खैरे : आज त्या जागेवर रसवंती सुध्दा सुरु झाली आहे. त्यावर काय कारवाई करणार आहात. आपण जबाबदार अधिकारी आहात जबाबदारीने उत्तर द्या. आठ दिवसात कारवाई झाली पाहिजे.

श्रीमती.स्वाती नागरे : मोकाट कुत्र्यांची संख्या खुप वाढली आहे. माझ्या वार्डात लहान मुलाला एका कुत्र्याने चावा घेतला.

श्रीमती.शेख नरगीस : कटकट गेटची खुप दुरावस्था झाली आहे. एक वर्ष झाले आहे इस्टीमेंन्ट बनवुन आता पर्यंत त्यावर मंजुरी मिळाली नाही.

मा.सभापती : मा.आयुक्तांनी शहरातील पुर्ण गेटच्या बाबतीत कार्यवाही सुरु केलेली आहे. याबाबत मा.आयुक्त खुलासा करतील.

मा.आयुक्त : दोन विषय समोर आले आहेत. कुत्र्यांच्याबाबतीत दोन गोष्टी केल्या नंतर ही समस्या सुटेल. एक तर जो पर्यंत कचरा राहील तो पर्यंत कुत्रे राहतील कचऱ्याचा विषय सुटला की, ८० टक्के कुत्र्यांचा विषय मिटेल. सर्व कुत्र्यांची लसीकरण करावी लागणार आहे. श्री.भालसिंग साहेब यांना नवी मुंबईला पाठवले आहे. तिथे कशा पध्दतीने ॲनिमल सेंटर करतात ते आणि एक संस्था खुप चांगली फेन डिफेन्स ऑफ ॲनिमल आम्ही त्यांच्या संपर्कात आहोत. त्यांना निमंत्रण सुध्दा केले आहे की तुम्ही औरंगाबादमध्ये या पण त्यांना येणे खुप अवघड जात आहे त्यामुळे त्यांनी सांगितले की तुम्ही आमची पध्दत बघुन जा. यामध्ये लवकरच तोडगा काढणार आहोत. सर्व गेटचे इंस्टिमेंन्ट केलेले आहेत. सर्वसाधारण सभेने ३० कोटी रु मंजुरी दिली आहे. कटकट गेटचा सहा लाखाचा इस्टिमेन्ट दिला आहे. लवकरच हे काम पुर्ण होणार आहे.

श्रीमती.शेख नरगीस : मुजिफ कॉलनीकडुन जो रस्ता कटकट गेट कडे जातो त्यावर दहा शाळा आहेत. रस्त्यावर खुप खड्डे झाले आहे.

श्री.गजानन बारवाल : शहरामध्ये अनेक ठिकाणाहुन जात असतांना खड्डयांचा प्रश्न निर्माण होत आहे.

मा.सभापती : पुर्ण शहराच्या खड्डे बाबत खुलासा करावा.

सिकंदर अली(कार्य.अ) : व्हीआयपी रोडचे काम सुरु केले आहे. तीन दिवसाच्या आत पुर्ण व्हीआयपी रोडचे काम होईल. सध्या काला दरवाजा जवळ काम चालु आहे. टेंडर सगळे कॉल करण्यात आले आहे.

मा.सभापती : सदस्यांचे म्हणणे आहे की, तुम्ही कुठले टेंडर काढले, किती काढले, याच्यावर काय काम करणार आहे. गणपती बसण्याआधी शहर खड्डे मुक्त करणार का?

सिकंदर अली(कार्य.अ) : १०० टक्के काम पुर्ण होईल.

श्री.शेख नदीम : मागच्या दोन दिवसांपासुन प्राणी संग्रहालयामध्ये जो प्रकार घडत आहे त्याबाबत श्री.नाईकवाडे साहेब काय करत आहे? कुत्र्यांनी वाघाच्या पिलांना सुध्दा मारुन टाकले आहे.

मा.सभापती : खुलासा करावा

पशुसंवर्धन अधिकारी : डॉ.खाजा मोईनोद्दीन इनामदार यानी ३० तारखेला माझी परिषदेकडे तक्रार केलेली होती की रजिस्टेशन नसतांना सराव करत आहेत. चार वर्षापासुन पूर्नरनोंदणी केलेली नव्हती.

मा.आयुक्त : वार्ड २,३ चे वार्ड इंजिनिअर जे ड्राईव्ह करत आहोत त्याच्या आधी रस्त्यावरील खड्डयांचा प्रश्न सोडवावा. येणाऱ्या सभेमध्ये प्रस्ताव ठेवण्यात यावा.

श्री.गजानन बारवाल : भारतीय पशुवैद्यकीय कायदा १९८४ चे कलम ५६ व ५७ अन्वये परिषदेची नोंदणीकृत पशुवैद्य नसतांना पशुवैद्य सेवा देण हा गंभीर गुन्हा आहे. तसे काही केले असेल तर कारवाई करण्यात येते. त्याच बरोबर वेतन वाढीसाठी नोंदणी प्रमाणपत्र आवश्यक आहे. आज पर्यंत दिलेली पशुवैद्य सेवा अवैध असल्याचा ग्राह्य का धरले जाऊ नये.

मा.सभापती : मा.आयुक्त याबाबत योग्य ती कारवाई करतील.

श्रीमती जयश्री कुलकर्णी : प्रत्येक बैठकीत लाईटच्या मेन्टेन्स बाबत विषय काढत असते पण ते काम होत नाही. एलईडी बसविण्यात वार्डांमध्ये भेदभाव केला जात आहे आणि एलईडीच्या क्वॉलिटी बद्दल शंका आहे.

श्रीमती.सत्यभामा शिंदे : तुकोबा नगरमधील मेन रोडवर तिथे एलईडी बसवण्यात यावे.

श्रीमती.स्वाती नागरे : माझ्या वार्डात फक्त तीन चार एलईडी लाईट बसवण्यात आले त्यातील काही लाईट बंद सुध्दा आहे. त्याची दखल घेण्यात यावी.

श्री.गजानन बारवाल : एलईडीचे काम अतिशय चुकीच्या पध्दतीने चालु आहे. लाईटची क्वॉलिटी बरोबर नाही.

श्री.शेख नदीम : या प्रकरणामध्ये दखल घेण्यासाठी फोन केला तर श्री.देशमुख हे फोन उचलत नाही. वार्डात एलईडीचे अर्धवट काम केले आहे.

श्री.सिध्दांत शिरसाट : जुन्या लाईटचे मेन्टेन्स करायला येत नाही आणि नवीन एलईडी बसले आहे त्याचा प्रकाश पडत नाही. लाईटच्या विषयामध्ये पीएमसी नेमलेली आहे का?

मा.सभापती : लाईट एक्सेस्टींग आहेत त्याचे मेन्टेन्स होत नाही. तुम्ही तीन महिन्याचा लोकांना एक्सेस्टींग दिला आहे. त्यांच्याकडुन काम करुन घेण्याची तुमची जबाबदारी आहे का नाही. जे कोणी कॅन्ट्रॅक्टर आहेत त्यांना सुचना द्या. एलईडीवाल्यांना नोटीस द्या. नगरसेवकांची क्वॉलिटीवर शंका आहे. रस्त्यावर एकाच व्हॉटचे लाईट ठेवावे. कंपनीला आज नोटीस द्या की, लावलेले दिवे दोन दिवसांमध्येच बंद पडत आहेत. फोन उचलत नाही म्हणुन नगरसेवकांची तक्रार आहे. इथुन पुढे तक्रार येता कामा नये.

श्रीमती.खान नसरीन बेगम : कोहिनुर कॉलनीमध्ये एक हॉल आहे तिथे लायब्ररी उघडण्यासाठी सहा महिन्यापासुन सांगत आहे. अधिकारी काहीच दखल घेत नाही.

मा.सभापती : मोहिम चालु आहे. लवकरच काम पुर्ण होईल.

श्रीमती.स्वाती नागरे : जुन्या लाईटचे दुरुस्तीचे कामाचे काय झाले.

मा.सभापती : याबाबत सुचना केली आहे.

श्री.रुपचंद वाघमारे : सेंट्रल जेलच्या पाठीमागे ५०० मी. पर्यंत दोन वर्षापासुन बांधकाम परवानगी देणे बंद केले आहे तरी सुध्दा तिथे बांधकाम चालु आहे.

मा.सभापती : यावर काय निर्णय करायचा त्यावर मा.आयुक्त निर्णय घेतील.

**विषय क्र. ८९ :**

विषय : घनकचरा व्यवस्थापन अंतर्गत चिकलठाणा व पडेगाव येथील कचरा प्रक्रीया केंद्र उभारण्यासाठी मा.स्थायी समितीची मान्यता घेणे बाबत.

संदर्भ : टेंडर आय.डी.क्र.-२०१८- AMCA-३२५७६८-१ सन २०१८-१९

| | | |
|---|---|---|
| १ | खात्याचे नांव | घनकचरा व्यवस्थापन विभाग |
| २ | कामाचे स्वरुप | घनकचरा प्रक्रिया अंतर्गत चिकलठाणा व पडेगाव येथे १५० टन प्रति दिवस क्षमतेचे केंद्र उभारणीसाठी यंत्रसामुग्री पुरवठा करणे, उभारणे, चाचणी देणे व ०५ वर्षाच्या कालावधीसाठी चालविणे व देखभाल दुरूस्ती करणे. |

| | | |
|---|---|---|
| ३ | पुर्वगणनपत्रक मान्य झाले आहे काय? असल्यास किती रकमेचे? मान्यतेचा ठराव? | होय. एकत्रित डी.पी.आर. र.रू.९१.७९५ कोटी, मान्यता दिनांक ०२/०४/२०१८ |
| | अ) त्यापैकी किती रकमेचे टेंडर्स मागविण्यात आले? | एजन्सीकडून देकार दर स्वरूपात |
| ४ | ज्या वृत्तपत्रांत टेंडर्सची जाहिरात देण्यात आली होती त्यांची नांवे व प्रसिध्दीचा दिनांक | जिल्हा स्तरावरील वर्तमानपत्रे मराठी ०२, राज्यस्तरीय वर्तमानपत्रे मराठी ०२, इंग्रजी ०२, आणि हिंदी ०१, राष्ट्रीय स्तरावरील वर्तमानपत्रे इंग्रजी ०२, हिंदी ०२ तसेच ई-टेंडर विभाग |
| ५ | अ) टेंडर्स स्विकारण्याची मुदत | दिनांक १४/०६/२०१८ ते २४/०७/२०१८ |
| | ब) टेंडर्स उघडल्याचा दिनांक | ३१/०७/२०१८ |
| ६ | एकूण किती टेंडर्स आली? | ०३ (तीन) |

(त्यापैकी पात्र टेंडरदारांची माहिती खालील तक्त्यात द्यावी)

| **अ.क्र.** | **ठेकेदाराचे नाव व पत्ता** | **प्राप्त टेंडर रक्कम रुपये** (एकत्रित मशिनरी खरेदी व ०५ वर्षे चालविणे, देखभाल व दुरूस्ती) | **पुर्वगणनपत्रकापेक्षा टक्केवारी कमी/जास्त** |
|---|---|---|---|
| ०१. | मायो वेसल्स ॲण्ड मशिन्स प्रा.लि. | मो.चिकलठाणा रू.१८,२६,९१,०००/-<br>मो.पडेगांव रू.१८,२६,९१,०००/- | First Lowest |
| ०२. | हायक्यिप प्रा.लि. | मो.चिकलठाणा रू.२१,७२,४०,०००/-<br>मो.पडेगांव रू.२१,७२,४०,०००/- | Second Lowest |
| ०३. | अल्फा थर्म प्रा.लि. | मो.चिकलठाणा रू.३४,९१,५०,०००/-<br>मो.पडेगांव रू.३४,९१,५०,०००/- | Third Lowest |

| | | |
|---|---|---|
| ७ | सर्वात कमी रक्कमेच्या टेंडरची शिफारस करण्यात आली आहे काय? | होय |
| | अ) सदरचे दर प्रचलित बाजारभावाशी सुसंगत आहे काय? | होय |
| | ब) जास्त दराच्या टेंडरची शिफारस करण्यात आली आहे काय? | नाही |
| | असल्यास कारणे नमुद करावीत. | लागू नाही |
| ८ | सदर कामाचा खर्च कोणत्या अंदाजपत्रकीय अर्थशिर्षकावर पडणार आहे? ते शिर्षक नमुद करावे. | शासकीय अनुदान (मशिनरी खरेदी) प्रक्रीया केंद्र चालविणे व देखभाल दुरूस्ती-मनपा फंड |
| | अ) खर्चासाठी पुरेशी तरतुद उपलब्ध आहे काय? | होय |
| ९ | सदर काम डिपॉझिटमधुन करण्यात येणार आहे काय? | --- |
| | अ) असल्यास डिपॉझिट रक्कम कोणत्या कार्यालयात जमा झाली आहे काय? (डिपॉझिट रजिस्टर-पान क्रमांक द्यावा) | --- |
| १० | सोबत मान्य पुर्वगणकपत्रकाच्या विषय पत्राचा नमुना जोडला आहे? | --- |

विषयाकिंत कामासाठी ठेकेदार मायो वेसल्स ॲन्ड मशिन्स प्रा.लि. यांनी बी-१ स्वरूपातील मो.चिकलठाणा रू.१८,२६,९१,०००/-+ मो.पडेगांव रू.१८,२६,९१,०००/- एकूण रक्कम रूपये ३६,५३,८२,०००/- (ज्याची फोड मशिनरी किंमत रूपये ३,३५,००,०००, ०५ वर्षे देखभाल दुरूस्ती व चालविणे, ०५ x २,९८,३८,०००/- = रूपये १४,९१,९०,००० याप्रमाणे प्रति युनिट एकत्रित रूपये १८,२६,९१,००० व ०२ युनिटसाठी एकूण रूपये ३६,५३,८२,०००) रकमेची सर्वात कमी दराची निविदा दाखल केली आहे.

०१. सदर कमी दराची निविदा असलेल्या निविदाधारका संदर्भात वर्तमानपत्रातून प्रसिध्द झालेल्या Black List बाबीसंबंधी सुनावणी घेण्यात आली.

०२. निविदाधारका बाबत मुख्यतः दोन आक्षेप नमुद असून निविदा धारकास अमरावती महानगरपालिकेकडून काळ्या यादीत (Black List) समाविष्ट करण्यात आल्याचे व त्यांचेकडे दोन वर्षाचा अनुभव नसल्याबाबत नमुद आहे.

काळ्या यादी बाबतच्या आदेशाची तपासणी केली असता, सदर कार्यवाही ही स्लॉटर हाऊस ई.टी.पी. बाबत व त्याचे हायड्रॉलिक टेस्टींग बाबत असल्याचे आढळून येते. यामध्ये आढळून आलेल्या बाबी प्रामुख्याने पुढील प्रमाणे आहेत.

(अ) आक्षेप ई.टी.पी. बाबत असून औरंगाबाद महानगरपालिकेचे निविदा नुसार काम हे घनकचरा प्रक्रिये बाबतचे आहे. संबंधीत एजन्सी यांना उज्जैन येथील प्लॉंट बाबत प्रथम क्रमांकाचा रँक देण्यात आल्याचे वर्तमानपत्रातून आढळून येते.

(ब) Black Listing ची कार्यवाही ही ई.टी.पी. च्या संबंधीत बांधकामा बाबत नसून हायड्रोलिक टेस्टींग बाबत आहे. संबंधीत एजन्सी यांनी ई.टी.पी. चे काम केल्याचे स्पष्ट केले व सदर बाब अमरावती महानगरपालिकेकडून त्यांचे पत्रात नमुद करण्यात आलेली नाही. अमरावती महानगरपालिकेने स्लॉटर हाऊस कार्यान्वित केल्याशिवाय ई.टी.पी. चे हायड्रोलिक टेस्टींग करता येत नाही व अद्यापपर्यंत स्लॉटर हाऊस कार्यान्वित झाले नसल्याचे नमुद केले.

(क) अनुभवाचे अनुषंगाने निविदाधारक यांनी तुर्भे, उज्जैन, बंगलोर इत्यादी ठिकाणी प्लँट उभे केल्याचे व बेहरामपुर, ओरिसा येथील कंत्राट सन २०१७ मध्ये मिळाल्याचे नमुद केले.

(ड) औरगाबाद महानगरपालिका फेब्रुवारी-२०१८ पासून कचऱ्याच्या समस्येमध्ये असून मा.उच्च न्यायालयाचे आदेशानुसार नारेगाव येथे कचरा टाकणे बंद करण्यात आले आहे. मागील कालावधीमध्ये कचरा प्रक्रियेसाठी जागेची निश्चिती करण्यात येऊन कचरा प्रक्रियेसाठीचा सविस्तर प्रकल्प अहवाल (डी.पी.आर.) शासनाकडून मंजुर करण्यात आला आहे. कचरा प्रक्रिया केंद्रे कार्यान्वित झाली नाही तर शहरातील दररोज जमा होणारा साधारणपणे ४५० मेट्रीक टन कचऱ्याची दुर्गंधी होऊन आरोग्य विषयक आणीबाणीची परिस्थिती निर्माण होऊ शकते. सद्यस्थितीत एकूण ०४ ठिकाणी कचरा जमा करण्यात येत असून बायोकल्चर फवारणी इत्यादी तात्पुरती प्रक्रिया करण्यात येत आहे.

(३) शहरातील नागरीकांचे आरोग्य व कचऱ्याबाबतची समस्या पाहता वर्तमानपत्रात प्रसिध्द झालेल्या बातमीच्या अनुषंगाने संबंधीत निविदा धारकाचा खुलासा मान्य करणे योग्य राहील.

(४) शहरातील कचरा समस्ये संदर्भात मा.उच्च न्यायालयाचे विशेष लक्ष असून मा.उच्च न्यायालयाने वेळोवेळी दिलेल्या निर्देशानुसार महानगरपालिकेने याबाबत रोडमॅप सादर केला आहे.

तरी सदरील काम मायो वेसल्स ॲन्ड मशिन्स प्रा.लि., कंत्राटदार यांचेकडून सर्वात कमी दराने म्हणजेच मो.चिकलठाणा रू.१८,२६,९१,०००/- + मो.पडेगांव रू.१८,२६,९१,०००/-एकूण रक्कम रूपये ३६,५३,८२,०००/- चे काम करून घेणेस व करार करणेस मा.स्थायी समितीची मान्यता घेणे बाबत सादर.

श्रीमती.राखी देसरडा : विषय क्र.८९ वर डीपीआर करणारे कंपनीचे काय मत आहे याचा खुलासा संबंधीत प्रतिनिधीने करावा आणि यामध्ये मनपाचे समाधान झाले नाही तर संबंधीत ठेकेदार त्या मशिन वापस घेणार आहेत का?

मा.सभापती : खुलासा करावा

घनकचरा व्यवस्थापन : जो प्लॅन करायचा आहे त्याची चाचणी द्यायची आहे आणि पाच वर्ष ते चालवायचे आहे. चाचणी दिल्यानंतर जर मशिन व्यवस्थित नसतील किंवा चालु शकणार नसतील तर निश्चितच वापस केल्या जाईल.

श्रीमती.राखी देसरडा : ज्या तीन एजन्सी घेण्यात आल्या आहे त्यांचे पत्ते देण्यात आलेले नाही. ते एका भागातील सुध्दा असु शकतात अशी माझी शंका आहे.

घनकचरा व्यवस्थापन : या तीन्ही एजन्सी वेगवेगळया आहेत.

श्रीमती.राखी देसरडा : यामध्ये पाच वर्ष लागणार आहे याचे लाईट बिल कोण देणार?

घनकचरा व्यवस्थापन : यामध्ये पाण्यासाठी आणि लाईटसाठी लागणारा खर्च तो एजन्सीकडुन राहणार आहे.

श्रीमती.राखी देसरडा : सदरील निविदा राष्ट्रीय स्थरावर निविदेत प्रसिध्दी दिली होती. यामध्ये जास्त निविदा धारकांनी सहभाग घ्यायला पाहिजे होता. परंतु तीनच निविदाधारकांनी यामध्ये प्रतिसाद घेतला आहे.

घनकचरा व्यवस्थापन : ई-टेंडर मध्ये जर तीन निविदा आल्या तर टेक्निकली ते ओपन करतो. यामध्ये तीनच का आल्या याबाबत सांगु शकत नाही.

श्रीमती.राखी देसरडा : वृत्तपत्रातुन कळाले की, संबंधीत एजन्सी ही अमरावती मनपामध्ये ब्लॅकलिस्ट आहे. अशी प्रसिध्दी दिल्या नंतर आज प्रशासन त्या बाबींचा खुलासा करत आहे.

मा.सभापती : सभागृहामध्ये याचा खुलासा होणे गरजेचे आहे की, कंपनी ब्लॅकलिस्टेड आहे का? सर्व स.सदस्यांचे म्हणणे आहे की, ब्लॅकलिस्टेड कंपनीला काम देत आहोत का?

घनकचरा व्यवस्थापन : घनकचरा प्रक्रिया अंतर्गत प्रोसेसिंगसाठी चिकलठाणा आणि पडेगाव येथे प्रति १५० मेट्रिक टन पर डे त्यानुसार जी निविदा काढली होती. सेंट्रलाईज प्रोसेसिंगसाठी तीन निविदा आल्या होत्या. १.मायो वेसल्स ॲण्ड मशिन्स प्रा.लि २.हायक्यिप प्रा.लि ३.अल्फा थर्म प्रा.लि

मा.सभापती : मायो वेसल्स ॲण्ड मशिन्स प्रा.लि ही कंपनी ब्लॅकलिस्टेड आहे किंवा नाही ते सांगावे.

घनकचरा व्यवस्थापन : नियमाने कागदपत्रे चेक केले तर पीएमसीने नेमलेली इको प्रो. यांनी कागदपत्रे चेक केल्यावर सर्व टेक्निकली त्या कॉलिफाय झाल्या. फायनाशिअल ओपन केल्यावर ११ ऑगस्टला श्री.जितेंद्र खाडे या नावाचे पत्र आले होते. त्यानंतर मायो वेसल्स या कंपनीला त्यांचे म्हणणे मांडण्यासाठी बोलवण्यात आले. २० ऑगस्टला मा.आयुक्तांच्या दालनामध्ये सुनावणी घेण्यात आली आणि ब्लॅकलिस्ट बाबतचे अमरावती मनपाचे पत्र होते. त्यामध्ये असे निदर्शनास आले की, अमरावती मनपामध्ये ही मायो वेसल्स नाही तर मोहनलाल भाटिया आणि किशनचंद भाटिया यांची कंपनी ब्लॅकलिस्ट करण्यात आली होती. याची सविस्तर सुनावणी मा.आयुक्तांच्या दालनात केली आहे. ज्या कामासाठी निविदा आहे त्यांचे काम योग्य पध्दतीचे आहे.

श्रीमती.सायरा बानो : अमरावती मनपाने या कंपनीला ब्लॅकलिस्ट केले आहे. त्यांना घेण्यात येऊ नये. कंपनी काम करत आहे पण त्यांना प्रमाणपत्र मिळालेले नाही. अनुभव करण्यासाठी त्यांना आपले शहर देण्यात येऊ नये कारण आठ महिन्यापासुन औरंगाबाद शहर कचऱ्यामुळे त्रस्त आहे.

श्री.गजानन बारवाल : नऊ ठिकाणी मशिनरी बसवणार होतो त्याचे काय झाले.

श्रीमती.शिल्पाराणी वाडकर : नऊ मशिनरीची ऑर्डर निघाली होती पण वृत्तपत्रातुन वाचले की, तीनच मशिन बसवण्यात आले आहे.

मा.सभापती : स.सदस्यांचे म्हणणे आहे की, नऊ मशिन बसवण्यासाठी मंजुरी दिली असतांना तीनच का बसवण्यात आल्या. खुलासा करावा

घनकचरा व्यवस्थापन : यांत्रिकी विभागाकडुन खुप आधी टेंडर निघाले होते. त्याच्या नंतर सेंट्रलाईज प्रोसेसिंगसाठी तीन ठिकाणाचे सेण्टर केले. आणि शहरातला ४५० मेट्रिक टन कचरा दिवसाला जमा होतो. विचारात घेऊन तीन मशिन बसवण्यात आल्या आहे.

श्री.गजानन बारवाल : तीनच ठिकाणी काम करणार आहोत का? बाकीचे मशिनरी रद्द केल्या आहे का?

मा.सभापती : नऊच्या नऊ मशिन महिन्याभरात बसवण्यात यावी.

श्री.गजानन बारवाल : ब्लॅकलिस्ट कंपनी बाबत योग्य प्रकारचे समाधान झालेले नाही.

घनकचरा व्यवस्थापन : अमरावती मनपाचे ब्लॅकलिस्ट आहे हे मान्य केले आहे पण कत्तलखान्याचा हायड्रोलिक रल जे ईटीपी तयार केले त्याचे हायड्रोलिक रल बद्दल वारंवार सुचना देऊन ते हायड्रोलिक रल देऊ शकले नाही त्या बद्दल आहे आणि आपले कामाचे जे स्वरुप आहे ते वेगळे आहे.

श्री.गजानन बारवाल : ब्लॅकलिस्ट कंपनीला काम देता येते का?

घनकचरा व्यवस्थापन :अमरावती मनपाचे ब्लॅकलिस्ट करतांना स्पष्ट नमुद केले आहे की,हायड्रोलिक ट्रायलसाठी वेळोवेळी पत्र देऊन सुध्दा यांनी हायड्रोलिक ट्रायल दिलेली नाही. आपण जेव्हा सुनावणी घेतली तेव्हा त्या कंपनीद्वारे मांडण्यात आले की, आम्ही पुर्ण ईटीपी तयार केला होता पण

तिथे कत्तल होत नसल्यामुळे कचरा तयार झाला नाही आणि आम्ही ईटीपीचा हायड्रोलिक देऊ शकलो नाही. ब्लॅकलिस्ट संदर्भात प्रिव्हिडमध्ये कोणताही मुद्दा उपस्थित झाला नाही.

श्री.गजानन बारवाल : हे टेंडर आपण पाच वर्षासाठी आहे पुर्ण ३६,५३,८२,०००/- टेंडर मंजुर करत आहोत. ऑपरेशन मेंन्टेन्ससाठी किती पैसे खर्च करणार आहे.

घनकचरा व्यवस्थापन : मायो वेसल्स कंपनीचे जे फायनशिअल आलेले आहे त्याच्यामध्ये मशिनसाठी ३,३५,००,०००/- रु. आलेले आहे आणि दर वर्षीच्या ऑपरेशन मेंन्टेन्ससाठी २,९८,३८,०००/- रु. एका साईटसाठी आले आहे. दोन साईटसाठी हे टेंडर आले आहे. चिलकलठाणा साईटसाठी १८,२६,९१,०००/- रु. आणि पडेगावसाठी १८,२६,९१,०००/- रु. आहे. पुर्ण पाच वर्षासाठी रु.३६,५३,८२,०००/- करत आहोत.

श्री.गजानन बारवाल : हा विषय प्राधान्याने मंजुर करावा.

श्री.सिध्दांत शिरसाट : कुठेही कचरा टाकु नये. ज्या ठिकाणी कचरा टाकण्याची व्यवस्था केली आहे तिथे कचरा टाकण्यात यावा.

मा.सभापती : केलेल्या खुलाशाप्रमाणे कंपनी या प्रकरणात ब्लॅक लिस्टेड नाही, असा खुलासा प्रशासनाने केला आहे, त्याप्रमाणे सर्व स.सदस्यांचे शंका निरसन झाले आहे, त्यानुसार ठरावास मंजूरी देण्यांत येते.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, घनकचरा प्रक्रिया अंतर्गत चिकलठाणा व पडेगाव येथे १५० टन प्रति दिवस क्षमतेचे केंद्र उभारणीसाठी यंत्रसामुग्री पुरवठा करणे, उभारणे, चाचणी देणे व ०५ वर्षाच्या कालावधीसाठी चालविणे व देखभाल दुरूस्ती करणे, या कामासाठी प्राप्त झालेल्या निविदापैकी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी दराचे निविदाधारक कंत्राटदार मायो वेसल्स ॲन्ड मशिन्स प्रा.लि., यांचेकडून सर्वात कमी दराने म्हणजेच मो.चिकलठाणा रू.१८,२६,९१,०००/- + मो.पडेगांव रू.१८,२६,९१,०००/-एकूण रक्कम रूपये ३६,५३,८२,०००/- चे काम करून घेणेस व करार करणेस तसेच सभागृहात झालेल्या चर्चेनुसार सदरील कंपनी या प्रकरणात ब्लॅक लिस्टेड नाही, असा खुलासा प्रशासनाने केलेला असल्यामुळे, ठरावास सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

## ऐनवेळचे विषय

**विषय क्र. ९० :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, वार्ड क्र.५ अंतर्गत वानखेडेनगर, होनाजीनगर एन-१३/सी सेक्टर येथे १००,१५० व २०० मीमी व्यासाची डी.आय.के.-७ लाईन टाकणे बाबत या कामासाठी रक्कम रू.२४,९२,२८६/- निविदा मागविण्यात आली होती, या कामासाठी ठेकेदार मे.जी.एस.आर. कन्स्ट्रक्शन यांच्याकडून अंदाजपत्रकीय दरापेक्षा म्हणजेच २८.९५% जास्त दराने म्हणजेच रक्कम रू.३२,१३,८०२/- पर्यंत करून घेण्यास व करार करण्यास मा.स्थायी समिती विषय क्र.२५० दि.२४/०१/२०१८ अन्वये मान्यता प्राप्त झाल्यानुसार संबंधीत ठेकेदार यांच्याकडून नियमानुसार करार करून त्यांना कार्यादेश देण्यात आलेला आहे.

या कामाच्या अंदाजपत्रकामध्ये १०० मीमी व्यासाचे डी.आय. पाईप-१००० मिटर, १५० मीमी व्यासाचे डी.आय.पाईप-२०० मिटर आणि २०० मीमी व्यासाचे डी.आय.पाईप २९० मिटर लांबी इ. समावेश आहे. परंतु प्रत्यक्ष स्थळ पाहणीमध्ये दिल्लीगेट ते हर्सुल रस्त्यालगत २५० मीटर लांबीचा अंदाजपत्रकामध्ये समावेश नाही. रस्त्यालगत असलेल्या २५० मीमी जलवाहिनीवरून पूर्वी पाच तास पाणी पुरवठा होता. परंतु सध्या फक्त ५० मिनिटे पाणी पुरवठा करण्यात येतो. त्यामुळे या रस्त्यालगत १०० मीमी व्यासाचा समावेश अंदाजपत्रकामध्ये केलेला नाही. परंतु स.नगरसेवक व तेथील नागरीकांना पिवळसर पाणी येत असल्याचे सांगितले. सदर २५० मीमी व्यासाची सी.आय. जलवाहिनी असून जवळपास पस्तीस वर्षापूर्वीची असल्याने आतील भाग रस्टींग झालेला असल्याने पिवळसर पाणी येते. करीता या भागात १०० मीमी व्यासाची डी.आय. जलवाहिनी टाकावी लागणार आहे. तसेच एन-१३/सी सेक्टर घरकुल योजने व्यतिरिक्त सिडकोकडून लहान आकाराचे भुखंड

एन-१३/सी सेक्टर जुन्या घराजवळ विक्री केले असल्याने त्या ठिकाणी १०० मीमी व्यासाची ५० मिटर जलवाहीनी टाकावी लागणार आहे. तसेच एन-१३/सी सेक्टर या ठिकाणी सिडकोकडून ऑडशेप जागा विक्री केल्याने जलवाहीनीचे अंतर जास्त झाल्याने १५० मीमी व्यासाची ४२ मिटर लांबी वाढलेली आहे.

या कामाचे मुळ अंदाजपत्रक रक्कम रू.२४,९२,२८५/- इतके आहे. कामाचे सुधारीत अंदाजपत्रक रू.४,२०,२०३/- वाढवून रक्कम रू.२९,१२,४८८/- इतकी झालेली आहे. मुळ अंदाजपत्रक रक्कम रू.२४,९२,२८५/- यास २८.९०% जास्त दराची मान्यता झालेली आहे. सुधारीत अंदाजपत्रक रक्कम रू.२९,१२,४८८/- च्या रक्कमेवर २८.९५% जास्त दर गृहीत धरून एकूण रक्कम रू.३७,५५,६५३/- इतकी होत आहे. तरी मंजुरी बाबतचा प्रस्ताव मा.स्थायी समिती सभेच्या विचारार्थ व मान्यतेस्तव सादर.

श्री.गजानन बारवाल : मागच्या वेळेस सांगण्यात आले होते की, जेवढे पाण्याचे विषय असतील त्याच्या बाबत किती जास्त आहे? त्याची माहिती सभागृहात यायला पाहिजे. सर्व सदस्यांचे पाण्याचे सर्व फाईल पेंन्डींग पडलेल्या आहे. त्याचा प्रस्ताव ठेवणार होतो त्याचे काय झाले?

मा.सभापती : श्री.चहल याबाबत खुलासा करावा.

कार्य.अभियंता(पा.पु) : निविदा अंतिम करण्यासाठी प्रस्ताव मा.सचिवांकडे पाठवलेला आहे.

श्री.गजानन बारवाल : पुढच्या येणाऱ्या बैठकी पर्यंत जेवढे पाण्याच्या फाईल बाकी असतील त्याची माहिती घेऊन योग्य प्रकारे सभागृहासमारे आणावी.

मा.सभापती : स.सदस्यांनी जी सुचना केली त्याची माहिती पुढच्या प्रस्तावा बरोबर देण्यात यावी. यामध्ये एक तर पाईप एकत्रित खरेदी करा. ज्या फाईल तयार झाल्या त्यावर ताबडतोब निर्णय घ्या. किती टक्के जास्त द्यायचा हा प्रशासनाचा विषय आहे. निर्णय घेऊन कामे ताबडतोब सुरु होतील अशा पध्दतीची कार्यवाही अपेक्षित आहे. विषय क्र.९० मंजुर.

**<u>ठराव :</u>**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र.५ अंतर्गत वानखेडेनगर, होनाजीनगर एन-१३/सी सेक्टर येथे १००, १५० व २०० मीमी व्यासाची डी.आय.के.-७ लाईन टाकणे या कामाचे सुधारीत अंदाजपत्रक रक्कम रू.२९,१२,४८८/- च्या रक्कमेवर २८.९५% जास्त दर गृहीत धरून एकूण रक्कम रू.३७,५५,६५३/- या रक्कमेस सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते, वैधानिक कार्यवाही व्हावी.

**<u>विषय क्र. ९१ :</u>**

१. प्रस्ताव सादर करण्यात येतो की, औरंगाबाद शहरास जायकवाडी धरणावरील ५६ व १०० दलली क्षमतेच्या दोन मुख्य योजनांच्या पंपांद्वारे पाणी उचल करुन पाणी पुरवठा करण्यात येतो. औरंगाबाद शहर हे जायकवाडी जलाशयापासून १५९ मीटर उंचीवर आहे. उचल होणारे पाणी परिमाण लोकसंख्येच्या प्रमाणात तोकडे आहे. शहराच्या १५ लक्ष लोकसंख्येसाठी मागणी व अत्यंत कमी उपलब्धता, यामुळे शहरातील अपुऱ्या टाक्यांमुळे असलेली कमी साठवण क्षमता, परिणामी ६० ते ७० टक्के परिसरांना बायपासद्वारे होणारा पाणी पुरवठा इत्यादी कारणामुळे शहर व सिडको परिसराच्या पाणी वितरणामध्ये असमतोलपणा व विस्कळीतपणा निर्माण होतो. उपरोक्त बाबी पाहता पाणी पुरवठा सुधारणांसाठी तांत्रिक तज्ञांची नियुक्ती करण्याचे प्रस्तावीत आहे.

२. यासाठी दिनांक १५.०६.२०१८ रोजी वर्तमानपत्रांमध्ये स्वारस्य सुचना (Expression of Interest) प्रसिध्द करण्यात आली. त्यानुसार १) श्री. राजेंद्र होलानी, सेवानिवृत्त सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण- तांत्रिक तज्ञ २) श्री. डॉ. संजय दहासहस्त्र, सेवानिवृत्त सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण- तांत्रिक तज्ञ (संबंधितांनी भ्रमणध्वनीवर आजारी असल्यामुळे काम करण्यास असमर्थता दर्शविली.) ३) युनिटी आय.ई.वर्ल्ड, पुणे- तांत्रिक तज्ञ, ४) श्री. शाम ठोंबरे, औरंगाबाद यांनी तांत्रिक तज्ञ म्हणून काम करण्यास स्वारस्य दर्शविले.

३. Expression of Interest नुसार स्वारस्य दाखविलेल्या तज्ञांपैकी योग्य तज्ञांची निवड करण्यासाठी सर्व संबंधितांना प्रत्यक्ष मुलाखतीसाठी बोलावून अनुषंगीक चर्चा करणे, मुलाखत घेणे किंवा प्राप्त प्रस्तावावर उचित तो निर्णय घेणे, या मध्ये शहराला उचित पाणी मिळण्याच्या दृष्टीने सर्व बाबी, करावयाची कामे, द्यावयाचा मोबदला इत्यादीवर निर्णय घेऊन सक्षम प्राधिकरणाकडे सादर करण्यासाठी दि. ०३.०८.२०१८ रोजी कार्यालयीन आदेशाद्वारे एक समिती गठीत करण्यात आली. समितीमध्ये आयुक्त - अध्यक्ष, उपायुक्त (आस्थापना)- सदस्य, मुख्य लेखाधिकारी- सदस्य तसेच कार्यकारी अभियंता- सदस्य सचिव यांची नेमणुक करण्यात आली होती.

४. Expression of Interest नुसार स्वारस्य दाखविलेल्या तज्ञांची दिनांक ०७.०८.२०१८ रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशाधन केंद्र येथे सकाळी १०.०० वाजता गठीत समिती मार्फत मुलाखत संपन्न झाली.

५. मुलाखतीस तांत्रिक तज्ञांपैकी ब्ल्यु स्ट्रीम इन्फ्रास्ट्रक्चर डेव्हलपमेंट कन्सलटंट प्रा.लि., कोथरुड, पुणे तर्फे श्री.राहुल कुमार आणि श्री.एस.वाय. ठोंबरे, कंत्राटी कनिष्ठ अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा उप विभाग, दहिवडी, जिल्हा सातारा हे उपस्थित झाले.

६. उपस्थित तांत्रिक तज्ञांपैकी श्री.एस.वाय.ठोंबरे हे कंत्राटी कनिष्ठ अभियंता म्हणून ग्रामीण पाणी पुरवठा उप विभाग, दहिवडी, जिल्हा सातारा येथे कार्यरत असून संबंधितांकडे EOI मध्ये नमुद केलेल्या कामाचा अनुभव नसल्यामुळे संबंधितांना शहराचे पाणी प्राधान्य लक्षात घेता तांत्रिक तज्ञ म्हणून नियुक्त करणे योग्य ठरणार नाही, अशी समितीने शिफारस केली.

७. तांत्रिक तज्ञ म्हणून उपस्थित दुसरी संस्था ब्ल्यु स्ट्रीम इन्फ्रास्ट्रक्चर डेव्हलपमेंट कन्सलटंट प्रा.लि., कोथरुड, पुणे या पाणी पुरवठा क्षेत्रामध्ये काम करणाऱ्या यंत्रणेचे संचालक श्री.राजेंद्र होलानी हे सेवानिवृत्त सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण असून त्यांना वैयक्तिकरीत्या पाणी पुरवठा क्षेत्रातील संपुर्ण बाबींचा सर्वंकष व प्रदीर्घ अनुभव आहे.

८. ब्ल्यु स्ट्रीम इन्फ्रास्ट्रक्चर डेव्हलपमेंट कन्सलटंट प्रा.लि., कोथरुड, पुणे या संस्थेला पुढीलप्रमाणे अनुभव आहे.

i. महाराष्ट्र जीवन प्राधिकरणामध्ये सदस्य सचिव म्हणून कार्यरत असतांना वरील कंपनीचे संचालक यांना गोरबे धरणावरुन नवि मुंबई ही ४२० दलली क्षमतेची योजना, ठाणे, भिवंडी आणि भाईंदरसाठी ३६० दलली क्षमता याशिवाय विविध मोठ मोठ्या शहरातील पाणी पुरवठा योजनांचा संचलन व वितरण व्यवस्थेचा अनुभव आहे.

ii. मलकापूर (कराड) येथे २४X७ पाणी पुरवठा योजना सन २००९ पासून सुरु केली असून ही योजना आताही कार्यान्वीत आहे.

iii. कंपनीचे संचालक यांना सेवेमध्ये असताना मा.प्रधानमंत्री, भारत सरकार यांचेकडून अत्युत्कृष्ट कामाबद्दल पुरस्कृत केलेले आहे.

iv. संबंधित संस्थेला पाणी पुरवठा विषयक हायड्रालीक मॉडेलिंग, नेटवर्क डिझाईन ॲनालिसिस याशिवाय अनुषंगीक बाबींचा अनुभव आहे. सद्यस्थितीत त्यांचेकडे पिंप्री चिंचवड शहर येथील २४X७ पाणी पुरवठ्यासाठी प्रकल्प व्यवस्थापन संकल्पनार्थी म्हणून काम सुरु आहे. तसेच या कामा अंतर्गत ४०% भागांना वरील पध्दतीने पाणी पुरवठा आजही सुरु आहे.

v. कर्नाटक राज्यामधील शहाबाद, यादगिर, बसवकल्याण, बिदर येथे देखील वरील प्रकारचे काम सुरु आहे. त्याशिवाय महाराष्ट्र राज्य व महाराष्ट्र राज्या बाहेर इतरही ठिकाणी काम सुरु आहेत.

९. ब्ल्यु स्ट्रीम इन्फ्रास्ट्रक्चर डेव्हलपमेंट कन्सलटंट प्रा.लि., कोथरुड, पुणे या यंत्रणेने औरंगाबाद शहरात करावयाच्या कामाबद्दल खालीलप्रमाणे प्रस्ताव सादर केला आहे. सादर केलेल्या प्रस्तावामध्ये कार्यव्याप्ती तसेच फीसची मागणी खालीलप्रमाणे नमुद केली आहे.

**Scope for Consultancy Services**

i) Reconnaissance Survey
ii) To understand present water supply to and consumption of people (to understand LPCD).
iii) To understand bulk water supply and actual water received at consumer end on volumetric basis by selecting scattered samples in the zones of water supply.
iv) Focussed approach on reducing leakages in areas having more physical losses and suggesting.
v) The measures for generating water out of leaks
vi) Making study of bulk system to suggest measures to fetch additional water
vii) Help AMC in preparing proper proposals for taking the distribution towards equitable.
viii) Preparing investment plan for above and guiding AMC in focussed implementation Hydraulic Designing of Existing Water Distribution Network and solutions for deficiency if any, in the areas where there is higher leakages and old distribution network.

**Deliverables of the Assignment**

All draft reports will be in 3 hard and one soft copy. All final reports in 3 hard and one soft copy.

**Time Frame**

i) Overall time frame - 12 months
ii) The Framework document giving solutions to be implemented - 3 months Development of priority wise detail design and estimates for its implementation - 6 months
iii) Implementation Support - Continuous hand holding till 12 months.

**Payment terms**

| Sr. No. | Payment schedule | % Payment of fees | Amount (Rs.) |
|---|---|---|---|
| 1. | 1 Month | 15 | 8,76,495/- |
| 2. | 2 Month | 15 | 8,76,495/- |
| 3. | 3 Month | 10 | 5,84,330/- |
| 4. | 4 Month | 10 | 5,84,330/ |
| 5. | 5 Month | 10 | 5,84,330/ |
| 6. | 6 Month | 10 | 5,84,330/ |
| 7. | 7 Month | 5 | 2,92,165/- |
| 8. | 8 Month | 5 | 2,92,165/ |
| 9. | 9 Month | 5 | 2,92,165/ |

| | | | |
|---|---|---|---|
| 10. | 10 Month | 5 | 2,92,165/ |
| 11. | 11 Month | 5 | 2,92,165/ |
| 12. | 12 Month | 5 | 2,92,165/ |
| | **Total** | **100** | **58,43,296/-** |

**Additional Charges and Taxes**

i) Project Management Consultancy charges will be extra if required.

ii) GST and other future taxes or change in the rate of taxes will be charged extra

१०. समितीतील सदस्यांनी औरंगाबाद शहरातील सद्यस्थितीच्या पार्श्वभूमीवर ब्ल्यु स्ट्रीम इन्फ्रास्ट्रक्चर डेव्हलपमेंट कन्सलटंट प्रा.लि., कोथरुड, पुणे यांनी सादर केलेल्या प्रस्तावावर चर्चा केली. सद्यस्थितीत महानगरपालिकेत उपलब्ध मनुष्यबळाची कमतरता तसेच एकंदरीत पाणी पुरवठा योजना सुधारण्यासाठी करावयाच्या Diagnostic Study चा अभाव आणि त्या अनुषंगाने तयार करावयाचा आराखडा System Improvement Plan (SIP), आणि पुढे त्या आराखड्याप्रमाणे एक-एक करुन हाती घ्यावयाच्या उपाय योजना या सर्व बाबी करण्यासाठी कुठल्या एका तज्ञाची एक पुर्ण टीम किंबहूना एजन्सी उपयुक्त असल्याचे समितीला वाटले.

११. ब्ल्यु स्ट्रीम इन्फ्रास्ट्रक्चर डेव्हलपमेंट कन्सलटंट प्रा.लि., कोथरुड, पुणे (BIDCPL) यांचेकडे महानगरपालिकेला अपेक्षित कामाचा अनुभव आहे. तसेच संबंधित संचालक हे सेवानिवृत्त सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण असुन शासकीय सेवेत असतांना त्यांना पाणी पुरवठा विषयक एकंदर सर्व कामांचा प्रदीर्घ पुर्वानुभव, याशिवाय त्यांनी स्थापन केलेल्या BIDCPL या कंपनीकडे देखील विस्तृत पाणी पुरवठा विषयक कामाचा अनुभव आहे. या बाबी लक्षात घेवून समितीने ब्ल्यु स्ट्रीम इन्फ्रास्ट्रक्चर डेव्हलपमेंट कन्सलटंट प्रा.लि., कोथरुड, पुणे BIDCPL यांनी दाखल केलेला प्रस्ताव शहरातील पाणी पुरवठा योजना सुधारण्यासाठी योग्य असल्याची शिफारस केली.

१२. वरील सर्व बाबी पाहता, औरंगाबाद शहर पाणी पुरवठा योजना सुधारणांसाठी तांत्रिक तज्ञ म्हणून ब्ल्यु स्ट्रीम इन्फ्रास्ट्रक्चर डेव्हलपमेंट कन्सलटंट प्रा.लि., कोथरुड, पुणे यांची नियुक्ती करणे आणि त्यांनी दाखल केलेला प्रस्ताव मा.स्थायी समिती सभेसमोर अवलोकनार्थ तथा मान्यतेस्तव सादर.

श्री.गजानन बारवाल : या विषयामध्ये श्री.राजेंद्र होलानी, श्री.डॉ.संजय दहासहस्त्र, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण तांत्रिक तज्ञ आणि श्री.शाम ठोंबरे, तांत्रिक तज्ञ म्हणुन काम करण्यास स्वारस्य दाखवली. एकीकडे आपण समांतरचे काम करत आहोत आणि यामध्ये ५८,४३,२९६/- रु. दर्शविले आहे ही रक्कम परवडणारी आहे का? याची सविस्तर माहिती देण्यात यावी.

श्रीमती.शिल्पाराणी वाडकर : समांतर योजनेचा विचार करत असतांना त्यावर पीएमसी आहे नवीन प्रक्रियेची गरज आहे का? आणि ऐवढे पैसे परवडणार आहेत का?

श्रीमती.सायरा बानो : अर्ध्या कोटीचा बोजा मनपावर पडेल हे उचित नाही. जे कर्मचारी घेतले आहेत त्यांच्याकडुन काम घेण्यात यावे.

मा.सभापती : याबाबतीत मा.आयुक्त सविस्तर पणे खुलासा करतील.

मा.आयुक्त : आधीच्या मुद्यांवर सुध्दा खुलासा करु इच्छितो. पहिला मुद्दा कचऱ्याचा आहे त्याच्या बद्दल बरेच वार्ड नागरीकांच्या मदतीने स्वच्छ होत आहे. कालची शताब्दी नगरची बातमी ती एनडीटीव्ही ने दिली आहे की, शहरामध्ये कचऱ्यापासुन पायपुस बनवत आहे. झोन नं.१ मध्ये वार्ड १९ आरेफा कॉलनी कचरा मुक्त झालेली आहे. येणाऱ्या सणांमध्ये स्वच्छ वार्ड स्पर्धा घेणार आहोत. झोन नं.४ मध्ये वार्ड २८ मध्ये काम चालु आहे. वार्ड २८ आणि १० चा कचरा एकाच ठिकाणी येऊन सॅनिटेशन पार्क बनवुन केला जाईल. झोन नं.२ मध्ये

नागेश्वरवाडीत ते काम चालु आहे. झोन नं.८ मध्ये जे दहा भाग आहे ते नो ओपन स्पेस मधुन सादत नगर मधील शंभुनगर कॉलनी, सिल्क मिल्क कॉलनी, ईट खेड्डा डिक्लेअर झाले आहे. झोन नं.९ मध्ये पन्नालाल नगर, विठ्ठु मंडळ सोसायटी, राखी भवन अशा चौदा ठिकाणी नो ओपन स्पेस डिक्लेअर झाले आहे. आणि पुढच्या महिन्याचे सुध्दा नियोजन झाले आहे. श्रीमती.वाडकर यांच्या वार्डातले का १५ सप्टेंबर पर्यंत पुर्ण होईल. झोन नं.८ मध्ये १०५,१०६,१०७ आणि ११० चे काम हाती घेतले आहे. झोन नं.३ मध्ये २५ आणि २७ वार्डामध्ये कचरा मुक्त वार्ड घोषित झाला आहे. वार्ड नं.२६,४२,४३,४४ आणि ५७ मध्ये काम चालु झाले आहे. झोन नं.५ मध्ये ३२ आणि ३६ वार्डाचे काम एका हफ्त्यात होईल. वार्ड क्र.३१,३९,३८,३३,३४ मध्ये काम चालु आहे. सोबतच ९५,९६ वार्डाचे काम पुर्ण होत आले आहे. ९७ आणि ९८ मध्ये काम चालु आहे. एलईडीच्या बाबतीत श्री.डी.पी.कुलकर्णी यांना लेखी दिलेले आहे. यामध्ये ज्या काही तक्रारी आहेत नियोजन पध्दतीने कशा लावल्या पाहिजे याचा पाठपुरावा करतो. हर्सुलच्या जेल कमिटीची मिटींग लावली होती पण काही कारणामुळे येता आले नाही. ती बैठक पुढच्या आठवड्यामध्ये लावणार आहोत. पाण्याच्या विषयाबाबतीत दोन कार्यकारी अभियंता आणि अकरा उपअभियंता लागणार आहे. महानगरपालिकेकडे एकही कार्यकारी अभियंता नाही. फक्त एक उपअभियंता आहे. आणि एनजीओ ने लेखी दिली आहे की, कुठलेही अधिकारी देऊ शकत नाही. प्रत्येक झोन मध्ये एक डेप्युटी इंजिनिअर असायला पाहिजे. ३० ज्युनिअर इंजिनिअर असायला पाहिजे ते फक्त १२ आहे. ३० ओव्हरशिअल असायला पाहिजे ते फक्त पाच आहे. १४७ लाईन मन असायला पाहिजे ते फक्त ६७ आहेत. कर्मचारी खुप कमी आहेत. मॅनेजमेन्टसाठी जी टीम लागते ती कमी आहे. मलकापुर मध्ये २४ तास पाण्याची व्यवस्था ज्यांनी करुन दाखवली ते श्री.होलाणी साहेब हे महाराष्ट्र जीवन प्राधिकरणाचे सेवा निवृत्त चिप इंजिनिअर राहिलेले आहेत. त्यांना स्वतः इकडे येण्यासाठी आमंत्रण केले आहे. ५०-६७ लाख रुपये जरी मोठे वाटत असेल तरी यामधील यंत्रणे पुर्ण पाणी पुरवठा सुधारण्यामध्ये मोलाचा हातभार लावणार आहे. विनंती आहे की, प्रस्ताव मंजुर करावा.

श्रीमती.राखी देसरडा : मा.आयुक्तांनी जो सविस्तर पणे खुलासा केला त्याबद्दल त्यांचे खुप खुप अभिनंदन करते.

श्री.गजानन बारवाल : हा जो खर्च होणार आहे तो मला योग्य वाटत नाही. हा विषय रद्द करण्यात यावा.

श्री.शेख नदीम : या विषयामध्ये अभ्यास करण्यासाठी वेळ पाहिजे.

मा.सभापती : मा.आयुक्तांनी खुलासा केल्यावर अभ्यास करण्याची काही आवश्यकता वाटत नाही.

श्री.सिध्दांत शिरसाट : विषय मंजुर करावा.

मा.सभापती : विषय क्र.९१ मंजुर करण्यात येतो.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, औरंगाबाद शहरास जायकवाडी धरणावरील ५६ व १०० दलली क्षमतेच्या दोन मुख्य योजनांच्या पंपांद्वारे पाणी उचल करुन पाणी पुरवठा करण्यात येतो. औरंगाबाद शहर हे जायकवाडी जलाशयापासून १५९ मीटर उंचीवर आहे. उचल होणारे पाणी परिमाण लोकसंख्येच्या प्रमाणात तोकडे असल्याने शहराच्या १५ लक्ष लोकसंख्येसाठी मागणी व अत्यंत कमी उपलब्धता, यामुळे शहरातील अपुऱ्या टाक्यांमुळे असलेली कमी साठवण क्षमता, परिणामी ६० ते ७० टक्के परिसरांना बायपासद्वारे होणारा पाणी पुरवठा इत्यादी कारणामुळे शहर व सिडको परिसराच्या पाणी वितरणामध्ये असमतोलपणा व विस्कळीतपणा निर्माण होत असल्याने, पाणी पुरवठा सुधारणांसाठी तांत्रिक तज्ञांची नियुक्ती करण्यासाठी दिनांक १५.०६.२०१८ रोजी वर्तमानपत्रांमध्ये स्वारस्य सुचना (Expression of Interest) प्रसिध्द करण्यात आल्यानुसार, औरंगाबाद शहर पाणी पुरवठा योजना सुधारणांसाठी तांत्रिक तज्ञ म्हणून ब्ल्यु स्ट्रीम इन्फ्रास्ट्रक्चर डेव्हलपमेंट कन्सलटंट प्रा.लि., कोथरुड, पुणे यांची नियुक्ती करणेस आणि या कामासाठी संबंधीत एजन्सीला प्रस्तावित प्रस्तावातील अटी शर्तीनुसार

खालीलप्रमाणे मानधनाच्या देयकाची अदाईगी लागु असलेल्या जीएसटी व इतर भविष्यातील लागू होणारे कर अथवा करांची दरवाढ तसेच कार्यव्याप्ती शिवाय करावयाच्या अतिरिक्त कामासाठी प्रकल्प सल्लागार शुल्क (Project Management Consultancy charges) देय राहील, यासह सर्वानुमते मंजुरी देण्यांत येते.

**Payment terms**

| **Sr. No.** | **Payment schedule** | **% Payment of fees** | **Amount (Rs.)** |
|---|---|---|---|
| 1. | 1 Month | 15 | 8,76,495/- |
| 2. | 2 Month | 15 | 8,76,495/- |
| 3. | 3 Month | 10 | 5,84,330/- |
| 4. | 4 Month | 10 | 5,84,330/ |
| 5. | 5 Month | 10 | 5,84,330/ |
| 6. | 6 Month | 10 | 5,84,330/ |
| 7. | 7 Month | 5 | 2,92,165/- |
| 8. | 8 Month | 5 | 2,92,165/ |
| 9. | 9 Month | 5 | 2,92,165/ |
| 10. | 10 Month | 5 | 2,92,165/ |
| 11. | 11 Month | 5 | 2,92,165/ |
| 12. | 12 Month | 5 | 2,92,165/ |
| | **Total** | **100** | **58,43,296/-** |

**Additional Charges and Taxes**

i) Project Management Consultancy charges will be extra if required.

ii) GST and other future taxes or change in the rate of taxes will be charged extra

वैधानिक कार्यवाही व्हावी.

या बरोबरच राष्ट्रगीताने सभा संपल्याचे मा.सभापती यांनी जाहीर केले.

**दिलीप सुर्यवंशी**
नगर सचिव,
महानगरपालिका औरंगाबाद